MHRG130000552025

**नियमित दिवाणी दावा क्र.०४/२०२५ मधील**

**निशाणी क्र.५ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादीविरुध्द तूर्तातूर्त मनाई हुकुम मिळण्यासाठी  दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ३९ नियम १ अन्वये दाखल केलेला आहे.

०२. **वादीचे थोडक्यात कथन पुढीलप्रमाणे** –

प्रतिवादीचे मालकीची गाव – कोलमांडले–ब, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील भुमापन क्र. १९९ क्षेत्र २–३३–०० आर्स, आकार रु.०–९६/– ही जमिन मिळकत आहे. सदर मिळकतीला दाव्यात यानंतर उल्लेखाचे सोयीकरीता दावा मिळकत असे संबोधण्यात आले आहे.

०३. वादी हा आंबा बागायत क्षेत्रातील तज्ञ असुन तो स्वतःच्या मालकीचे जागेत अथवा लेखी किंवा तोंडी कराराने अन्य व्यक्तींच्या मालकीची बाजती आंब्याच्या जमिन मिळकती कराराने घेऊन त्या आंब्याच्या झाडांची वर्षभर निगा राखुन त्याला खत–पाणी देवुन आंब्याच्या झाडांची देखरेख करुन ती आंब्याच्या मोसमात फुलवुन त्या आंब्यांचा पाडा करुन त्याची विक्री करण्याचे काम करतो व तो त्याचा व्यवसाय आहे. प्रतिवादीची दावा मिळकतीत १२५ हापुस आंब्याची व रायवळ आंब्यांची बाजती झाडे आहेत. प्रतिवादीने, वादीला जानेवारी, २०२३ मध्ये दावा मिळकतीतील बाजती झाडे ही त्या झाडांना शास्त्रशुद्ध पद्धतीने खत–पाणी करुन त्या आंब्याचा पाडा करणेकरीता सन २०२३–२४ व सन २०२४–२५ या कालावधीकरीता पाडा करणेकरीता दावा मिळकत वादीचे ताब्यात दिली होती व

सदर दावा मिळकत आजही वादीचे ताब्यात आहे व याकरीता प्रतिवादीने वादी कडुन सन २०२३-२४ या मोसमाकरीता रक्कम रुपये २,००,०००/-(रुपये दोन लाख मात्र) व सन २०२४-२५ या मोसमाकरता रक्कम रुपये २,००,०००/-(रुपये दोन लाख मात्र) अशी एकुण रक्कम रुपये ४,००,०००/- (रक्कम रुपये चार लाख मात्र) जानेवारी २०२३ मध्ये वादीकडुन प्राप्त केली होती.

०४. यानंतर वादीने दावा मिळकतीतील झाडांची देखरेख करुन त्याला नियमित सेंद्रिय खते टाकुन गेले दिड वर्षे सातत्याने काळजी घेतलेली आहे. दरम्यान कबरस्तान नजीक जमिन मिळकतीत असलेली बोरवेले खराब झाली म्हणुन सदर बोरवेलचे दुरुस्तीचे व लाईटचे काम आशिष कदम, राहणार- वाळवटी, ता. श्रीवर्धन, जि.रायगड यांचेकडुन त्याची रक्कम रुपये २,८००/-(रुपये दोन हजार आठशे मात्र) दिनांक १० नोव्हेंबर, २०२३ रोजी अदा करुन बोरवेलची दुरुस्ती करुन घेतली व लाईचे काम केले. तसेच प्रत्येकवेळी वर नमुद जमिन मिळकतीची साफसफाई करणेकरीता वेळोवेळी सहा कामगार लावुन सदर मिळकत अद्ययावत स्थितीत व साफ ठेवलेली आहे व त्याचा खर्च रक्कम रुपये १५,०००/-(रुपये पंधरा हजार मात्र) झालेला आहे. तसेच सन २०२४ च्या मोसमातही वादी यांनी सदर मिळकतीची देखभाल व फवारणी करीता सहा कामगार सातत्याने लावुन त्याबाबत रक्कम रुपये ४०,०००/- (रुपये चाळीस हजार मात्र) चा खर्च केलेला आहे. इतकेच नव्हेतर वेळोवेळी खताची फवारणी करुन गेले दीड वर्षाहुन अधिक काळ सदर मिळकतीतील झाडे सुस्थितीत ठेवलेली आहेत.

०५. माहे फेब्रुवारी-२०२३ मध्ये वादीने भारत जाधव, रा. माणगाव, जि.रायगड यांची पोकलेन बोलावुन त्याच्या सहाय्याने दावा मिळकतीची साफसफाई केली होती. वादीने त्यासाठी भरत जाधव यांच्या पत्नी नम्रता जाधव यांच्या

एच.डी.एफ.सी बँक मध्ये गुगल-पे व्दारे दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी युटीआय आयडी ३०१०३९०९२४६७ अन्वये रुपये १/-, दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी युटीआय आडी नं.३०११५१७१७०२४ अन्वये रक्कम रुपये १०,०००/-, दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी युटीआय आयडी नं. ३०११७९६२२४९५ व्दारे रक्कम रुपये १०,०००/-, दिनांक ३१ जानेवारी, २०२३ रोजी युटीआय आयडी नं.३०३१८५७७२७३२ व्दारे रक्कम रुपये १०,०००/-, दिनांक ३१ जानेवारी, २०२३ रोजी युटीआय आयडी नं.३०३१३३९७८००७ व्दारे रक्कम रुपये १०,०००/- अशी एकुण रक्कम रुपये ४०,००१/-(रुपये चाळीस हजार एक मात्र) दिलेले आहेत.

०६. मागील वर्षी खत फवारणीचा खर्च रक्कम रुपये ६०,०००/- (रुपये साठ हजार मात्र) आलेला असुन तद्नंतर दिनांक ४ जुन, २०२४ रोजी पुनश्च सदर झाडांना सेंद्रीय खते व फवारणी करीता रक्कम रुपये ६५,०००/-(रुपये पासष्ठ हजार मात्र) खर्च आलेला आहे व तो खर्चवादीनी केलेला आहे. इतकेच नव्हेतर प्रतिवादीच्या कबरस्थानचे जागेत असणाऱ्या आंब्याच्या झाडांवर किटकनाशकाची फवारणी करणेकरीता प्रतिवादीने, वादीस जानेवारी, २०२४ मध्ये सांगितले असता वादीने ती फवारणी करुन त्याचा खर्च रक्कम रुपये ६,३००/-(रुपये सहा हजार तीनशे मात्र) आलेला आहे.

०७. अशा तऱ्हेने वादींनी वर नमुद दावा मिळकत व त्यातील झाडे सुस्थितीत ठेवणेकरीता त्या मिळकतीच्या देखभालीवर व खतांवर वारेमाप खर्च केलेला आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादीने दिनांक ७ जुन, २०२४ रोजी वादीला रक्कम रुपये १,००,०००/- (रुपये एक लाख मात्र) गुगल-पे व्दारे अचानकपणे पाठवुन व्हॉसअॅप वर मेसेज केला की, वादी व प्रतिवादी दरम्यानची वर नमुद जमिन

मिळकतीतून आंब्याचा पाडा करण्याची डिल प्रतिवादी रद्द करत आहे. यावर वादीने, प्रतिवादीस व्हॉसअॅपवर मेसेज केला होता की, आठ दिवसानंतर प्रतिवादी गावाला येणार आहे, त्यावेळी दोघांनी एकत्र बसुन योग्य तोडगा काढु. यावर प्रतिवादीने, वादीला पोलिस कंप्लेंट करणारा मेसेज पाठवला होता. व त्यानंतर दिनांक १९ जुन, २०२४ रोजी पोलिस निरीक्षक श्रीवर्धन पोलिस ठाणे यांना प्रतिवादीने अर्ज केला व वादी बरोबर प्रतिवादीने पाडा करण्याचा व्यवहार ठरविला असल्याचे नमुद करुन वादी केमिकल खतांचा वापर करत आहे व वादीला, प्रतिवादीचे वर नमुद जमिन मिळकतीत येण्यास मज्ञाव करावा असा अर्ज प्रतिवादीने केला व त्याबाबत वादीला संबंधीत पोलिसांनी दिनांक २६ जुन, २०२४ रोजी पोलिस स्टेशनला बोलावले व वादीला काहीही कारण नसताना प्रतिवादीचे खोट्या तक्रारीवरुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४९ ची नोटीस दिली व सदर बाब ही दिवाणी स्वरुपाची असल्याचे दोघांना सांगितले.

०८. वादीने, प्रतिवादी बरोबर सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या कालावधीकरीता गाव-कोलमांडले, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील भुमापन क्र. १९९, क्षेत्र २-३३-०० आर्स, आकार रुपये ०.९६/- ही दावा मिळकत पाडा करण्याकरीता ताब्यात घेतलेली आहे व त्याचा मोबदला ही प्रतिवादीने स्वीकारलेला आहे व याची प्रतिवादीस संपुर्ण कल्पना आहे. असे असताना दिनांक ३ ऑगस्ट, २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास प्रतिवादीचे सांगण्यावरुन प्रतिवादीचे ओळखीचे अनीस पांगारकर, राहणार- कोलमांडला, ता. श्रीवर्धन, जि. रायगड हे वादी सदर जमिन मिळकतीत जमिनीची देखभाल करीत असताना आले व त्यांनी बळजबरीने खते टाकण्याचा प्रयत्न केला व वादीस जीवे मारण्याची धमकी दिली, म्हणुन वादींनी या घटनेबाबत श्रीवर्धन पोलिस ठाणे येथे दिनांक ३ ऑगस्ट,

२०२४ रोजी तक्रार दाखल केली आहे व संबंधितांवर नॉनकॉगनायझेबल गुन्हा दाखल झाला आहे. व सदरील बाब ही बेकायदेशीर आहे. प्रतिवादी व वादी दरम्यानचा सदर जमिन मिळकतीतील आंब्याचा पाडा करण्याचा मौखिक करार आजही अस्तित्वात आहे व तो प्रतिवादी एकटे रद्द करु शकत नाही. इतकेच नव्हेतर त्याचा मोबदला प्रतिवादीने स्वीकारलेला आहे. व वादीने त्यबाबत सदर जमिन मिळकतीत वारेमाप खर्च देखील केला आहे व याची प्रतिवादीस कल्पना आहे.

०९. या घटनेनंतर वादीने, प्रतिवादीला त्याचे वकिलांमार्फत दिनांक १३ ऑगस्ट, २०२४ रोजीची नोटीस दिली व त्यामध्ये प्रतिवादीने मे, २०२५ पर्यंत मौखिक करार अस्तित्वात असेपर्यंत वादीला दावा मिळकतीत पाडा करण्यात अडथळा करु नये अन्यथा वादी, प्रतिवादीवर योग्य ती न्यायालयीन कारवाई करेल असे सांगितले.

१०. प्रतिवादी वादीला रक्कम रुपये ३,६९,१०१/-(रुपये तीन लाख एकोणसत्तर हजार एकशे एक मात्र) इतके प्रतिवादीचे मिळकतीचा देखभाल खर्च देणे लागत आहे. सदर खर्च प्रतिवादीकडुन वादीला येणे बाकी आहे. पैकी रक्कम रुपये १,००,०००/-(रुपये एक लाख मात्र) प्रतिवादीने वादीला गुगल-पे केले असल्याने वादीला, प्रतिवादीकडुन रक्कम रुपये २,६९,१०१/-(रुपये दोन लाख एकोणसत्तर जार एकशे एक मात्र) व त्यावरील व्याज असे येणे बाकी आहे.

११. यानंतर दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी गाव-कोलमांडले, ता. श्रीवर्धन, जि.रायगड येथील भुमापन क्र.१९९, क्षेत्र २-३३-०० आर्स, आकार रुपये ०.९६/- जवळ वादीच्या अत्यंत जवळचा अनीस पांगारकर, राहणार-कोलमांडला, ता. श्रीवर्धन, जि. रायगड हा आला व त्याने सदर मिळकतीची पहाणी करण्याचे हेतुने सदर मिळकतीत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला यावेळी वादीने त्यास

थांबविले असता तो म्हणाला की, आता मला एजाज उमर उकये हे, ही मिळकत पाड्याकरीता देणार आहेत म्हणुन मी पहाणी करीत आहे. तरी अशा तऱ्हेने प्रतिवादी, वादीच्या दावा मिळकतीमध्ये आंब्याचा पाडा करण्याच्या कायदेशीर हक्काबाबत अडथळा निर्माण करु पाहत आहे, वादीने सन २०२४-२५ चे मोसमाकरीता सदर मिळकतीतील सदर झाडांच्या देखभालीकरीता वारेमाप खर्च केलेला असुन सदर मोसमात पाडा करण्याचा नैसर्गिक अधिकार वादीला आहे. असे असताना प्रतिवादीने, सदर मिळकतीत वादीचा असलेल्या ताब्यास तसेच सन २०२४-२५ चे मोसमात तसेच प्रतिवादीकडुन वादीला देय रक्कम प्राप्त होईपर्यंत पाडा करण्यापासुन प्रतिवादीने मज्ज्ञाव केल्यास वादीचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. प्रथम दर्शनी केस व न्यायाचा तराजु वादीच्या लाभात आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्याची विनंती केली आहे.

१२. प्रतिवादीने त्यांची कैफियत निशाणी क्र.१८ वर दाखल केली. त्याने वादीने दाखल केलेला दाव्यातील कथने नाकारली आहेत. त्याचे असे कथन आहे की, वादीने सदरचा दावा फक्त त्याला नाहक्क त्रास देण्याकरिता व त्याच्या मिळकतीमधील आंब्याचे पिक विनामोबदला गिलंकृत करण्याण्याकरिता दाखल केला आहे. दावा मिळकत ही प्रतिवादी व त्यांच्या भावंडांची सामाईक मिळकत आहे व सदर दावा दाखल करताना सदर दावा मिळकतीच्या सर्व मालकांच्या विरूध्द दावा दाखल करणे गरजेचे होते. परंतू वादी यांनी असे केलेले नाही व त्यासंदर्भात कोणतेही स्पष्टीकरण सुध्दा दिलेले नाही. त्यामुळे सदर दाव्यास आवश्यक पक्षकार सामील न केल्याची बाधा येत आहे.

१३. त्याने पुढे असे कथन केले की, सदर दावा मिळकत ही त्याची सामाईक मालकी व ताबा वहिवाटीची आहे. त्याची दावा मिळकतीमध्ये २०० हापुस

आंब्याची व २० रायवळ आंब्याची बाजती झाडे आहेत. तो सेंद्रिय खतांचा वापर करून झाडांची निगा राखतो. त्याने सदर मिळकतीत सन २०२१ ला ३०० चंदनाच्या झाडांची लागवड केली होती. त्याने वादी यांना फक्त ०१ वर्षा करिता सदर दावा मिळकतीत आंब्याचा पाडा करण्याच्या कामाकरिता ठेकेदार म्हणुन नेमले होते. सदर ०१ वर्षाचा आंब्याचा पाडा करण्याचा काम संपल्यानंतर सदर मिळकत पुन्हा स्वतःच्या ताब्यात घेतली व सन २०२४ मध्ये त्याने स्वत: आंब्यांचा पाडा केलेला आहे. त्याने सदर मिळकतीमध्ये उपजिवीका करण्यासाठी श्रीवर्धन कृषी विभागाचे अधिकारी व अलिबागचे कृषी खात्याचे वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली १२०० बेडगी मिर्चीची रोपे व १००० टोमॅटो व इतर भाजीपाल्यांच्या रोपे विकत घेऊन व मजुरी देऊन लागवड केली आहे.

१४. प्रतिवादीने पुढे असे कथन केले आहे की, तो कॅन्सर रुग्ण असल्यामुळे त्याला आंब्याचा पाडा करणे जमत नसल्यामुळे त्याने वादी यांना सन २०२३ मध्ये म्हणजेच जुलै २०२३ पर्यंत एका मोसमाकरिता फक्त २०२३ या वर्षाकरिता आंब्यांचा पाडा करण्याच्या कामाकरिता व बागेची देखरेख करणेकरिता ठेकेदार म्हणुन नेमलेला होता व त्याचा मोबदला म्हणुन प्रतिवादी यांनी सदर आंब्याचा पाडा करून येणारे पीकाचा निम्मा हिस्सा हा वादी व निम्मा हिस्सा प्रतिवादी असे वाटप करून घेतला होता. त्यावर्षीच वादी यांनी प्रतिवादींच्या आंब्याच्या झाडाला सेंद्रिय खताचा परंतू वापर न करता केमीकलयुक्त खत झाडांना टाकले होते व त्यामुळे झाडांचे नुकसान झाले होते. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादीला पुढच्या वर्षी म्हणजेच २०२४ किंवा त्यानंतर कधीही प्रतिवादीच्या मिळकतीमधील आंब्याचा पाडा करणेकरिता परवानगी दिलेली नाही किंवा त्यासंदर्भात कोणताही तोंडी अथवा लेखी करार प्रतिवादीने वादीसोबत केलेला नाही. तरी देखील वादी हे

प्रतिवादीच्या मिळकतीत घुसखोरी करून प्रतिवादीची कोणतीही तोंडी अथवा लेखी परवानगी न घेता प्रतिवादींनी आंब्याच्या झाडांना टाकलेले सेंद्रिय खत काढून त्याठिकाणी प्रतिवादच्या झाडाला केमीकलयुक्त खते टाकलेली आहे. याची माहिती प्रतिवादींना मिळाल्यानंतर प्रतिवादी यांनी वादीना संदेश पाठवुन असे करण्यास हरकत केली.

१५. परंतू त्यानंतर सुध्दा वादी हे प्रतिवादीच्या मिळकतीमध्ये बेकायदेशीर रितीने घुसत असल्यामुळे व प्रतिवादीच्या झाडांना केमीकलयुक्त खत टाकून नुकसान पोहचवत असल्यामुळे प्रतिवादी यांनी दिनांक १९/०६/२०२४ रोजी पोलिस स्टेशन श्रीवर्धन येथे वादीच्या विरूध्द तक्रारी अर्ज दाखल केला होता. वादी हे दावा मिळकतीत बेकायदोशीररित्या घुसत होते व प्रतिवादीने लागवड केलेल्या ३०० चंदनांच्या झाडांपैकी २७० ते २८० झाडांची १५०० रांटीबाटा आंब्याची झाडांचे, १२०० बेडगी मिर्चीची रोपे व १००० टोमॅटो व इतर भाजीपाल्यांच्या झाडांची नासधुस वार्दीच्या कामगारांमार्फत वादीने केली.

१६. प्रतिवादीने पुढे असे कथन केले आहे की, यावर्षीचे म्हणजेच २०२५ चे आंब्याचा पाडा करणेकरिता त्याने श्री. अनिश पांगारकर यांना जुलै २०२४ मध्ये दिलेले आहे व त्याकरिता त्याच्यात व श्री अनीस पांगारकर यांच्या मध्ये दिनांक ०९/०८/२०२४ रोजी करार पत्र करण्यात आलेले आहे. सदर मिळकत ही आंब्याचा पाडा करणेकरिता अनीस पांगारकर यांना दिली आहे याची माहिती वादीला असताना देखील वादी हे जोरजबदरदस्तीमध्ये प्रतिवादीच्या मिळकतीत शिरत असल्यामुळे श्री. अनीस पांगारकर यांनी सुध्दा वादीविरुध्द श्रीवर्धन पोलिस स्टेशन मध्ये दिनांक ०३ ऑगस्ट २०२४ रोजी तक्रार एनसीआर नं. ०१७४ / २०२४ अन्वये दाखल केली होती. त्यानंतर प्रतिवादिनेही वादीच्या विरुध्द दिनांक

१२/११/२०२४ रोजी तक्रारी अर्ज पोलीस ठाणे श्रीवर्धन येथे दाखल केला होता. त्यानंतर श्रीवर्धन पोलिस ठाणे यांनी दिनांक १८/१२/२०२४ रोजी जावक नं. ३०९०/२०२४ ने समजपत्राद्वारे पोलिस निरीक्षक यांनी वादीला प्रतिवादीच्या बागेत प्रवेश करून नये तसेच कामगारांना सुध्दा साफसफाईचे काम अगर इतर कामासाठी बागेत पाठवु नये याबाबत समज दिली होती.

१७. प्रतिवादीने पुढे असे कथन केले आहे की, सदरचे प्रकरण प्रलंबित असल्यामुळे प्रतिवादींनी वादीविरूध्द दिवाणी न्यायालयात कारवाई केलेली नाही. याऊलट प्रतिवादीने वादीला यावर्षीचे आंब्याचे पिक विनामोबदला न दिल्यामुळे व व त्याच्या विरूध्द पोलिस तक्रार केल्यामुळे वादीने सदरचा खोटा दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे त्याने वादीचा दावा व मनाई हुकुमाचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

१८. प्रतिवादीने पुढे असे कथन केले आहे की, सदरचा दावा मे. न्यायालयात प्रलंबित असताना व मे. न्यायालयाची कोणतीही परवानगी नसताना तसेच मे. कार्यकारी दंडाधिकारी श्रीवर्धन यांनी वादीविरूध्द नोटीस, समन्स व अटक वॉरंट काढल्यानंतर देखील वादी हे प्रतिवादच्या मिळकतीमध्ये दिनांक ०१/०३/२०२५ रोजी जोरजबरदस्तीने श्री. संजय पवार यांना सोबत घेऊन श्री. अनीस पांगारकर हे मिळकतीत घुसण्यास हरकत करत असताना देखील दमदाटी करून सदर मिळकतीमध्ये बेकायदेशीररित्या घुसले व प्रतिवादींच्या झाडाला नुकसान व्हावे व आंब्याच्या झाडांना लागलेला मोहर नष्ट व्हावे या उद्देशाने वादीनी प्रतिवादीच्या झाडांना केमिकलचा वापर करून फवारणी केली आहे. सदर घटना घडतेवेळी प्रतिवादी हे मुंबई येथे होते. म्हणुन हे सर्व प्रतिवादीना समचताच प्रतिवादीनी वादीच्या विरूध्द दिनांक ०१/०३/२०२५ रोजी श्रीवर्धन पोलिस

स्टेशन मध्ये ईमेलद्वारे तक्रारी अर्ज दाखल केलेला आहे. परंतु, वादी हे दिनांक २९/०३/२०२५ पासून दावा मिळकतीमध्ये शिरून जोरजबरदस्तीने ४ डजनाचे १४ पेटी तयार आंबे काढून घेऊन गेलेले आहेत. यासंदर्भात प्रतिवादी यांनी वादीविरुद श्रीवर्धन पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर कारवाई होऊन वादीविरूध्द दिनांक ०३/०४/२०२५ रोजी बी एन एस कलम ३०३ (२), ३२९ (३) व ३ (५) अन्वये एफआयआर नं. २४/२०२५ दाखल झालेली आहे.

१९. वादी व प्रतिवादीच्या कथनांचा व त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचा विचार करता खालील मुद्दे माझ्यासमक्ष उपस्थित होतात. त्यांचे निष्कर्ष मी त्याखाली दिलेल्या करणांसह खालीलप्रमाणे नोंदवीत आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी सिद्ध करतो काय की, त्याच्या लाभात प्रथमदर्शनी केस आहे? | **नकारार्थी** |
| २. | वादी सिद्ध करतो काय की न्यायाचा समतोल त्याच्या बाजूने आहे? | **नकारार्थी** |
| ३. | वादी सिद्ध करतो काय की त्याच्या लाभात मनाई हुकूम न दिल्यास त्याचे अपरिमित व कशानेही न भरून येणारे नुकसान होणार आहे? | **नकारार्थी** |
| ४. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करिता :-</u>**

२०. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादीने त्याला जानेवारी, २०२३ मध्ये दावा मिळकतीतील हापूस आंब्यांची व रायवळ आंब्याची बाजती झाडांना शास्त्रशुद्ध पद्धतीने खत–पाणी करुन त्या आंब्याचा पाडा करणेकरीता सन २०२३–२०२४ व सन २०२४–२०२५ या कालावधीकरीता दावा मिळकत ही वादीच्या ताब्यात दिली होती व दावा मिळकत आजही वादीच्या ताब्यात आहे. वादीचे असेही कथन आहे की, आंब्याचा पाडा करण्याकरिता त्याने प्रतिवादीला सन २०२३–२०२४ व सन २०२४–२०२५ या मोसमाकरता दरवर्षी रक्कम रुपये २,००,०००/– प्रमाणे अशी एकुण रक्कम रुपये ४,००,०००/– ही जानेवारी २०२३ मध्ये दिलेली आहे. परंतु, प्रतिवादीने त्याच्या कैफियतीमध्ये सदरची बाब नाकारली आहे. प्रतिवादीने त्याच्या कैफियतीमध्ये त्याने वादीला केवळ सन २०२३–२०२४ या वर्षाकरिता आंब्याचा पाडा करण्याकरिता ठेकेदार म्हणून नेमले असल्याचे कथन केले आहे.

२१. वादी व प्रतिवादींच्या कथनांवरुन असे स्पष्टपणे दिसुन येते की, त्यांच्यामध्ये आंब्याचा पाडा करण्याकरिता वर नमूद कालावधीसाठी कोणताही लेखी करार झालेला नव्हता. वादीच्या कथनानुसार आंब्याचा पाडा करण्यासाठी त्याच्यात व प्रतिवादीमध्ये सन २०२३–२०२४ व २०२४–२०२५ या दोन वर्षाच्या कालावधीकरिता तोंडी करार झालेला आहे. परंतु, प्रतिवादीच्या कथनानुसार आंब्याचा पाडा करण्यासाठी त्याच्यात व वादीमध्ये सन २०२३–२०२४ या एक वर्षासाठी तोंडी करार झालेला होता. वादी व प्रतिवादी या दोघांच्या कथनांवरुन दोन्ही पक्षकारांमध्ये सन २०२३–२०२४ या कालावधीकरिता आंब्याचा पाडा करण्यासाठी तोंडी करार झाला होता असे स्पष्टपणे दिसुन येते. परंतु, वादी व प्रतिवादी यांच्यात सन २०२४–२०२५ या कालावधीकरिता दावा मिळकतीत

असलेल्या आंब्याचा पाडा करण्यासाठी तोंडी करार झाला होता या विषयी वाद असल्याचे स्पष्टपणे दिसुन येत आहे. प्रस्तुतचा अर्ज हा वादीने प्रतिवादी याने सन २०२४-२०२५ या कालावधीकरिता दावा मिळकतीत असलेल्या आंब्याचा पाडा करण्यासाठी वादीला मज्जाव करु नये असा मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला असल्यामुळे सन २०२४-२०२५ या कालावधीमध्ये वादी व प्रतिवादी यांच्या दावा मिळकतीमध्ये असलेल्या आंब्याचा झाडाचा पाडा करण्यासाठी करार झाला होता काय व करार झाला असल्यास त्याअनुषंगाने वादीने सदर कराराप्रमाणे जुन २०२४ पासून ते मे-२०२५ या कालावधीत दावा मिळकतीत काय गुंतवणुक किंवा विकास कामे केली आहेत हे पाहणे गरजेचे आहे.

२२. वादीच्या कथनानुसार २०२४-२०२५ या कालावधीकरिता दावा मिळकतीत असलेल्या आंब्याचा पाडा करण्यासाठीचा करार तोंडी आहे. त्यामुळे सदर कराराबाबत कागदोपत्री पुरावा संचिकेवर दाखल नाही. संचिकेवर दाखल कागदपत्रांवरुन व वादी व प्रतिवादीच्या कथनांवरुन असे दिसुन येते की, प्रतिवादीने वादीला दि.०७/०६/२०२४ रोजी १ लाख रुपये परत केले आहे. प्रतिवादीच्या वकीलांनी युक्तीवादामध्ये असे कथन केले आहे की, वादीने दावा मिळकतीत जुन महिन्यात प्रतिवादीला न विचारता रासायनिक खते व फवारणी केली व त्या खर्चाचा परतावा म्हणून प्रतिवादीने वादीला १ लाख रुपये दिले आहे. परंतु, वादीच्या वकीलांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असे कथन केले आहे की, सन २०२४-२०२५ या कालावधीकरिता आंब्याचा पाडा करण्याकरिता करारापोटी वादीने प्रतिवादीला जे पैसे दिले होते ते प्रतिवादीने परत केले आहे. वादी व प्रतिवादीमध्ये कराराबाबत लेखी दस्तऐवज झालेला नसल्यामुळे रुपये १ लाख हे प्रतिवादीने वादीला का परत केले हे पुराव्याअंती स्पष्ट होणार आहे. वर नमूद कारणास्तव वादी व प्रतिवादीमध्ये

सन २०२४-२०२५ या कालावधीकरिता आंब्याचा पाडा करण्याकरिता करार झाला होता ही बाब वादीने प्रथमदर्शनी सिध्द केलेली नाही.

२३. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये सन २०२४-२०२५ या कालावधीमध्ये आंब्याचा पाडा करण्याकरिता करार झाला होता काय ही बाब पुराव्याअंती सिध्द होणार आहे व त्या करिता संपरिक्षा घ्यावी लागणार आहे. परंतु, याक्षणी वादी व प्रतिवादी यांच्यात सन २०२४-२०२५ या कालावधीमध्ये दावा मिळकतीतील आंब्याचा पाडा करण्याकरिता करार झाला होता असे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही.

२४. वादीच्या कथनानुसार त्याने प्रतिवादीला सन २०२३-२०२४ व सन २०२४-२०२५ या दोन वर्षाच्या कालावधीकरिता प्रत्येक वर्षासाठी रुपये २ लाख प्रमाणे एकुण ४ लाख दिले आहेत. परंतु, वादीने प्रतिवादीला रुपये ४ लाख हे कोणत्या प्रकारे दिले याचे कोणतेही कथन वादीने दाव्यात केलेले नाही. त्यामुळे संचिकेवर वादीने रुपये ४ लाख प्रतिवादीला दिल्याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा नाही.

२५. वादीच्या कथनावरुन असे दिसुन येते की, सन २०२३ ते २०२४ या कालावधीमध्ये दावा मिळकतीत आंब्याचा पाडा करण्याकरिता त्याने प्रतिवादीसोबत करार केला होता व त्या अनुषंगाने त्याने दावा मिळकतीची साफसफाई करण्याकरिता भरत जाधव यांना काम दिले होते. वादीने भरत जाधव यांना सदर कामासाठी दि.११/०१/२०२३ रोजी दोन वेळा ऑनलाईन रुपये १० हजार, दि.३१/०१/२०२३ रोजी दोन वेळा ऑनलाईन रुपये १० हजार असे एकुण ४० हजार दिले होते. तसेच फवारणी कामी रुपये ६० हजार खर्च केले होते असे दिसुन येते. यावरुन वादीने सन २०२३ ते २०२४ या कालावधीमध्ये दावा मिळकतीत

साफसफाईचे काम व फवारणीचे काम याकरिता रुपये १ लाख खर्च केल्याचे दिसुन येते. वर नमूद कथनांवरुन वादीने दावा मिळकतीत सन २०२३ ते २०२४ या कालावधीमध्ये साफसफाईचे काम व फवारणीचे कामाकरिता खर्च केला असल्याचे दिसुन येते. परंतु, वादीने सन २०२४ ते २०२५ या कालावधीमध्ये जुलै २०२४ ते दावा दाखल करेपर्यंत दावा मिळकतीत आंब्याच्या झांडासाठी विकासाची कोणती कामे केली, त्यासाठी किती पैशाची गुंतवणुक केली याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. त्यामुळे वादीने सन २०२४ ते २०२५ या कालावधीमध्ये जुलै २०२४ ते दावा दाखल करेपर्यंत दावा मिळकतीत आंब्याच्या झांडासाठी विकासाची कोणती कामे केली, त्यासाठी किती पैशाची गुंतवणुक केली याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा आलेला नाही.

२६. वादी व प्रतिवादीच्या विद्वान वकीलांनी केलेल्या युक्तीवादावरुन आंब्याचा बागाचा करार कसा केला जातो हे लक्षात येते. दोन्ही वकीलांच्या युक्तीवादाप्रमाणे प्रत्येक वर्षाच्या जुन महिन्यामध्ये करार चालु होतो व तो पुढील वर्षाच्या मे महिन्यामध्ये संपतो. जुन महिन्यापासून आंब्याच्या झाडांची देखरेख करणे, खते घालणे, साफसफाई करणे, मंदुकली तोडणे, आळी करणे, फवारणी करणे अशी आंब्याची मशागत करावी लागते, त्यानंतर डिसेंबर महिन्यामध्ये आंब्यांच्या झाडांना मोहोर येतो व साधारणपणे एप्रिल ते मे महिन्यांच्या काळामध्ये आंब्यांचे फळ झाडाला लागते व त्याची तोडणी केली जाते. त्यामुळे वर नमूद युक्तीवादावरुन असे दिसुन येते की, आंबा बागेच्या करारामध्ये जुन महिन्यापासुन बागाची निगा ठेवणे, खते घालणे, साफसफाई करणे इत्यादी प्रकारची कामे एप्रिल ते मे महिन्यापर्यंत म्हणजेच आंब्यांच्या झाडांना आंबे लागण्यापर्यंत करावी लागतात.

२७. प्रस्तुत प्रकरणात वादीने जुन २०२४ ते मे २०२५ या कालावधीमध्ये आंब्याच्या झाडांची देखरेख करणे, खते घालणे, साफसफाई करणे, मंदुकली तोडणे, आळी करणे, फवारणी करणे अशी आंब्याची मशागत केली आहे याबाबत काय प्रथमदर्शनी पुरावा आला आहे हे पाहणे गरजेचे आहे.

२८. प्रतिवादीच्या कथनानुसार दावा मिळकतीत असलेल्या आंब्याचा पाडा करण्याकरिता सन २०२४ ते २०२५ या कालावधीसाठी वादीसोबत करार करण्यासाठी त्याने नकार दिलेला आहे व अनीस पांगारकर या दुसऱ्या व्यक्तीबरोबर त्याने सन २०२४ ते २०२५ या कालावधीसाठी करार केलेला आहे. संचिकेवर दाखल दि.०९/०८/२०२४ रोजीच्या करारपत्रावरुन असे दिसुन येते की, प्रतिवादीने अनीस पांगारकर याच्यासोबत सन २०२४ ते २०२५ या कालावधीकरिता दावा मिळकतीत असलेल्या आंब्याचा पाडा करण्याचा करार केलेला आहे व त्या अनुषंगाने एकुण मोबदला १ लाख ७० हजार ठरवून रक्कम रुपये ५० हजार ही आगाऊ रक्कम घेतली आहे. सदर करारामध्ये प्रतिवादीने पांगारकर याला दावा मिळकतीतील झाडांची देखरेख करणे, खते घालणे, साफसफाई करणे, मंदुकली तोडणे, आळी करणे, फवारणी करणे अशी आंब्याची मशागत करायची आहे. त्यामुळे सदर करारावरुन असे प्रथमदर्शनी दिसुन येते की, प्रतिवादीने अनीस पांगारकर याच्यासोबत सन २०२४ ते २०२५ या कालावधीकरिता दावा मिळकतीत आंब्याचा पाडा करण्यासाठी करार केला आहे.

२९. प्रतिवादीने दि.१९/०६/२०२४ रोजी श्रीवर्धन पोलीस स्टेशन येथे दिलेल्या तक्रार अर्जावरुन असे दिसुन येते की, प्रतिवादीने सन २०२३ ते २०२४ या एक वर्षाच्या कालावधीसाठी दावा मिळकतीतील आंब्याचा पाडा करण्याचा करार केलेला होता व तो त्याने संपुष्टात आणला आहे. वादी हा दावा मिळकतीत

असलेल्या झाडांकरिता रासायनिक खते वापरुन झाडांना नुकसान करत असल्याची तक्रार प्रतिवादीने अर्जात केली आहे. दि.२६/०६/२०२४ रोजी श्रीवर्धन पोलीसांनी प्रतिवादीला आंब्याच्या बागेच्या वादावरुन भांडणे करु नये याबाबत नोटीस दिली आहे. संचिकेवर दाखल अदखलपात्र गुन्हा नोंद क्र.१७४/२०२४ यावरुन असे दिसुन येते की, अनीस पांगारकर याने वादीविरुध्द दावा मिळकतीत आंब्याच्या झाडाला खत टाकण्यासाठी विरोध करुन शिवीगाळ व धमकी दिल्यामुळे तक्रार दाखल केली आहे.

३०. संचिकेवर दाखल दि.१२/११/२०२४ रोजीच्या तक्रार अर्जावरुन असे दिसुन येते की, वादीने प्रतिवादीच्या दावा मिळकतीत असलेल्या चंदनाच्या झाडांची व रांटीबाठा आंब्याच्या रोपांची तोडून नासधूस केली आहे. दि.१८/१२/२०२४ रोजीचे समजपत्रावरुन असे दिसुन येते की, पोलीसांनी वादीला प्रतिवादीच्या आंब्याच्या बागेत प्रवेश करु नये किंवा कामगारांना कामासाठी बागेत पाठवू नये याबाबत समज दिली आहे. दि.०५/११/२०२४ व दि.०३/०३/२०२५ रोजीच्या नोटीसांवरुन असे दिसुन येते की, कार्यकारी दंडाधिकारी श्रीवर्धन यांनी वादी विरुध्द चाप्टर केस प्रमाणे १६६/२०२४ व १६७/२०२४ दाखल केली आहे व वादीने सहा महिने कालावधीकरिता शांतता राखावी म्हणून बंधपत्र लिहून देण्याकरिता उपस्थित राहण्यासाठी सुचित केले आहे.

३१. वर नमूद कागदपत्रांवरुन असे दिसुन येते की, दावा मिळकतीतील सन २०२४–२०२५ या कालावधीमध्ये आंब्याचा पाडा करण्यासाठी वादी व प्रतिवादीमध्ये जुन २०२४ पासून वाद निर्माण झाला होता व त्या अनुषंगाने वादी व प्रतिवादी यांनी एकमेकांवर फौजदारी तक्रारी दाखल केलेल्या आहेत व त्या तक्रारी दि.०३/०३/२०२५ पर्यंत झालेल्या आहेत. त्यामुळे जुन २०२४ पासून वादी व

प्रतिवादी यांचे संबंध बिघडले असल्याचे दिसुन येत आहे. प्रतिवादीने वादीला दावा मिळकतीत येण्यापासून प्रतिबंधही केलेला आहे. पोलीसांनीही त्याकरिता वादीला समज दिल्याचे दिसुन येत आहे.

३२. वादीच्या संपुर्ण दाव्यामध्ये वादीने केवळ दि.०४/०६/२०२४ रोजी खते व फवारणी केल्याचे कथन केले आहे. परंतु, त्यानंतर वादीने दावा मिळकतीत आंब्याच्या बागेसाठी काय कामे केली याबाबत काहीही कथन केलेले नाही. त्यामुळे वादीने जुलै २०२४ ते मे २०२५ या कालावधीमध्ये दावा मिळकतीत आंब्याच्या बागेसाठी झाडांची देखरेख करणे, खते घालणे, साफसफाई करणे, मंदुकली तोडणे, आळी करणे, फवारणी करणे अशी कोणतीही कामे केली असल्याबाबत वादीने कथन केलेले नाही व त्याबाबत प्रथमदर्शनी पुरावा सादर केलेला नाही.

३३. वादीने त्याच्या दाव्यामध्ये मान्य केले आहे की, दावा मिळकत ही प्रतिवादीच्या मालकीची आहे व प्रतिवादीची दावा मिळकतीत १२५ हापुस आंब्याची व रायवळ आंब्यांची बाजती झाडे आहेत. त्यामुळे दावा मिळकतीतील आंब्याच्या झाडांची मालकी ही प्रतिवादीची आहे असे स्पष्टपणे दिसुन येते. संचिकेवर दाखल कागदपत्रावरुन तसेच दोन्ही पक्षकारांच्या कथनांवरुन असे स्पष्टपणे दिसुन येते की, वादी व प्रतिवादीमध्ये दावा मिळकतीतील आंब्याच्या बागेच्या सन २०२४-२०२५ या कालावधीमध्ये आंब्याचा पाडा करण्याचा कराराबाबत जुन २०२४ मध्ये वाद निर्माण झाला होता व प्रतिवादीने वादीला आंब्याच्या बागेत येण्यासाठी व कोणतेही काम करण्यास विरोध केलेला आहे. तसेच संचिकेवरील कथनांवरुन व कागदपत्रांवरुन असेही दिसुन येते की, जुलै २०२४ नंतर वादीने आंब्याच्या बागेत बागेसाठी झाडांची देखरेख करणे, खते घालणे, साफसफाई करणे, मंदुकली तोडणे, आळी करणे, फवारणी करणे अशा प्रकारची कोणतीही कामे केलेली नाहीत.

प्रतिवादीने दावा मिळकतीतील आंब्याच्या बागेचा सन २०२४-२०२५ या कालावधीमध्ये आंब्याचा पाडा करण्याचा करार हा अनीस पांगारकर यांच्यासोबत केलेला आहे व अनीस पांगारकर याने सन २०२४-२०२५ या काळामध्ये बागेसाठी झाडांची देखरेख करणे, खते घालणे, साफसफाई करणे इत्यादी कामे केलेली आहेत. अनीस पांगारकर याने सदर करारापोटी प्रतिवादीला ५० हजार रुपये रक्कम दिल्याचे करारावरुन दिसुन येत आहे. त्यामुळे दावा मिळकतीतील सन २०२४ ते २०२५ या कालावधीत येणाऱ्या आंब्याचा पाडा करण्याचा अधिकार हा प्रतिवादीने अनीस पांगारकर याला दिलेला आहे, असे संचिकेवरील दाखल कागदपत्रांवरुन प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

३४. वादीने सन २०२४ ते २०२५ या संपुर्ण एक वर्षाच्या कालावधीत जुलै २०२४ ते मे २०२५ पर्यंत दावा मिळकतीत असलेल्या आंब्याच्या बागेची झाडांची देखरेख करणे, खते घालणे, साफसफाई करणे, मंदुकली तोडणे, आळी करणे, फवारणी करणे इत्यादी कामे केली असती तर वादीला निश्चितपणे एप्रिल-मे या महिन्यात दावा मिळकतीत येणाऱ्या आंब्यांच्या फळाचा पाडा करण्याचा अधिकार राहिला असता. परंतु, वादीने सन २०२४ ते २०२५ या कालावधीतील कराराच्या अनुषंगाने जुलै २०२४ नंतर दावा मिळकतीतील आंब्याच्या बागेत कोणत्याही प्रकारचे काम केले असल्याबाबत कथन केलेले नाही किंवा सकृतदर्शनी पुरावा दाखल केलेला नाही. संचिकेवर दाखल फौजदारी तक्रारीवरुन असे दिसुन येते की, प्रतिवादीने १९ जुन २०२४ पासून वादीला दावा मिळकतीतील आंब्याच्या बागेत येण्यासाठी व काम करण्यासाठी विरोध केलेला आहे. त्यामुळे वादीला दावा मिळकतीतील आंब्याच्या बागेसाठी सन २०२४ ते २०२५ या कालावधीसाठी आंब्याचा पाडा करण्याचा कराराचे विशेष पुर्ती करुन मिळण्यासाठी जुलै २०२४

मध्ये प्रतिवादीला सुचित करणे गरजेचे होते. विकल्पाने त्या करिता न्यायालयात दावा दाखल करुन कराराची विशेष पुर्ती करुन मागणे गरजेचे होते. परंतु, वादीने प्रस्तुतचा दावा दाखल करेपर्यंत काही केलेले नाही.

३५. वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीतील सन २०२४ ते २०२५ या कालावधीत येणाऱ्या आंब्याचा पाडा करण्याचा करार हा प्रतिवादीने रद्द केलेला आहे व तो रद्द करण्याचा अधिकार प्रतिवादीला नाही. यावरुन असे दिसुन येते की, जुन २०२४ मध्ये वादी व प्रतिवादीमधील दावा मिळकतीतील आंब्याचा पाडा करण्याचा करार हा पुढे नियमीत करण्यात आलेला नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादीने कोणतेही कारण नसताना वादी सोबत असलेला करार रद्द केला असल्यास जुलै २०२४ नंतर त्वरीत वादीने सदर कराराची विशेष पुर्ती करुन मिळण्यासाठी न्यायालयात दावा दाखल करणे गरजेचे होते. परंतु, वादीने तसे न करता प्रस्तुतचा दावा हा केवळ प्रतिवादीविरुध्द मनाई हुकुमासाठी व नुकसान भरपाई मिळण्याकामी दि.२२/०१/२०२५ रोजी दाखल केल्याचे दिसुन येत आहे. वादीने मनाई हुकुमासाठी व नुकसान भरपाई मिळण्याकामी सदर दावा दाखल करण्यावरुन असे दिसुन येत आहे की, वादीला सन २०२४-२०२५ च्या कालावधीत दावा मिळकतीतील आंब्याचा पाडा करण्याच्या कराराची विशेष पुर्तता करुन मिळण्याबाबत कोणताही रस नाही.

३६. त्यामुळे दावा मिळकतीतील आंब्याच्या बागेसाठी सन २०२४ ते २०२५ या कालावधीसाठी आंब्याचा पाडा करण्याचा अधिकार वादीला असल्याचे वादीने प्रथमदर्शनी सिध्द केलेले नाही. त्यामुळे वादीने त्याची प्रथमदर्शनी केस सिध्द केलेली नाही असे माझे मत आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

३७. दावा मिळकत ही प्रतिवादीच्या मालकीची आहे व प्रतिवादीची दावा मिळकतीत १२५ हापुस आंब्याची व रायवळ आंब्यांची बाजती झाडे आहेत. त्यामुळे दावा मिळकतीतील आंब्याच्या झाडांची मालकी ही प्रतिवादीची आहे असे स्पष्टपणे दिसुन येत आहे. सन २०२४–२०२५ या कालावधीमध्ये आंब्याचा पाडा करण्यासाठी प्रतिवादीने अनीस पांगारकर या व्यक्तीसोबत करार केलेला आहे. प्रतिवादीने अनीस पांगारकर यांच्या कडून रुपये ५० हजार मोबदला घेतल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे सन २०२४–२०२५ या कालावधीमध्ये दावा मिळकतीत आंब्याचा पाडा करण्यासाठी अनीस पांगारकर या व्यक्तीचे हक्कहितसंबंध निर्माण झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. परंतु, प्रस्तुत दाव्यामध्ये वादीने अनीस पांगारकर या व्यक्तीला पक्षकार केलेले नाही. वादी सन २०२४–२०२५ या कालावधीमध्ये दावा मिळकतीत आंब्याचा पाडा करण्यासाठी प्रतिवादी विरुध्द मनाई हुकूम मागत असल्यामुळे व सदर कालावधीमध्ये दावा मिळकतीत आंब्याचा पाडा करण्यासाठी अनीस पांगारकर या व्यक्तीचे हितसंबंध निर्माण झाल्यामुळे अनीस पांगारकर या दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार होता परंतु, वादी याने त्याला प्रस्तुत दाव्यात पक्षकार केलेले नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादीविरुध्द मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादी किंवा त्याच्या वतीने अनीस पांगारकर हा दावा मिळकतीतील एप्रिल–मे २०२५ मध्ये आंब्याचा पाडा करु शकणार नाही व त्यामुळे प्रतिवादीचे व अनीस पांगारकर याचे कशानेही न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सोयीचा समतोलही प्रतिवादीच्या बाजुने आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ व ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता :–</u>**

३८. वरील मुद्यांचे नकारार्थी निष्कर्ष पाहता वादीचा तुर्तातुर्त मनाई हुकमाचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. करिता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

वादीचा अंतरिम/ तुर्तातूर्त मनाई हुकमाचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

ANIL SITARAM SATOTE
Digitally signed by ANIL SITARAM SATOTE
Date: 2025.04.25 17:27:00 +0530

ठिकाण-श्रीवर्धन, (श्री. ए. एस. साटोटे)
दिनांक – २५/०४/२०२५ दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर श्रीवर्धन